# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. २५ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## नेत्यांच्या स्मारकांपेक्षा रुग्णालये आणि शाळांचीच गरज!

देशातील आणि राज्यातील राजकारणाचा स्तर दिवसेंदिवस खालावत असताना, केवळ राजकीय नेत्यांची किंवा महापुरुषांची भव्य स्मारकं उभारून मतांचे राजकारण करण्याची जणू चढाओढच लागली आहे. अशा परिस्थितीत स्मारकांऐवजी शाळा आणि रुग्णालये उभारा, अशी जनहिताची भूमिका घेणे म्हणजे थेट राजकीय रोष ओढावून घेणे ठरते. छत्रपती संभाजीनगर येथील जालना रोडवरील शासकीय दूध डेअरीच्या जागेवर एका दिवंगत नेत्याचे स्मारक...

---> अग्रलेख - पान 2 वर


**पाहिजेत**

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### कॉर्पोरेट जिहाद' रोखण्यासाठी कायद्यात होणार बदल : फडणवीस

**मुंबई :** राज्यातील बहुराष्ट्रीय आणि आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या उच्चशिक्षित महिलांना लक्ष्य करून त्यांचे सक्तीने धर्मांतर करणे, मानसिक छळ आणि लैंगिक शोषण करण्याचे अत्यंत धक्कादायक प्रकार अलिकडच्या काळात उघडकीस आले आहेत. या गंभीर प्रकरणांची दखल घेत, "कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी आणि या नव्या स्वरूपाच्या संघटित गुन्हेगारीला रोखण्यासाठी विद्यमान कायद्यांमध्ये व्यापक सुधारणा व बदल करण्यात येतील," अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली. शिवाय खासगी क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षेसाठी आणि कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या (विधानसभा आणि विधान परिषद) महिला सदस्यांची एक विशेष समिती स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. भाजप आमदार चित्रा वाघ यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून नाशिकमधील टीसीएस आणि पुण्यातील विप्रो कंपनीतील 'कॉर्पोरेट जिहाद' धक्कादायक उदाहरणे देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले.

### महाराष्ट्रात ॲमेझॉनसाठी गुंतवणुकीच्या व्यापक संधी - मुख्यमंत्री

**मुंबई :** डेटा सेंटर क्षेत्रात महाराष्ट्राने देशात अग्रस्थान प्राप्त केले असून, या क्षेत्राच्या विस्तारासाठी राज्यात अत्याधुनिक आणि अनुकूल परिसंस्था विकसित करण्यात येत आहे. डेटा सेंटर्सबरोबरच आरोग्य, तंत्रज्ञानाधारित पायाभूत सुविधा, डिजिटल नवोपक्रम तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित कौशल्य विकास यांसारख्या क्षेत्रांमध्येही मोठ्या गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध आहेत. या संधींचा लाभ घेत ने महाराष्ट्रात आपली गुंतवणूक वाढवावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ॲमेझॉनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जेसी यांच्यासोबत झालेल्या भेटीत राज्यातील गुंतवणुकीच्या संधी, तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य आणि भविष्यातील विकास प्रकल्पांवर सविस्तर चर्चा झाली. महाराष्ट्र हे उद्योग, तंत्रज्ञान आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचे प्रमुख केंद्र बनत असून, जागतिक कंपन्यांसाठी राज्यात अनुकूल वातावरण उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्री यांनी यावेळी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने देशातील अग्रणी राज्य आहे राज्याची अर्थव्यवस्था ६६० अब्ज डॉलर्स इतकी आहे.

### भुजबळ यांच्या प्रयत्नांना यश; धान्य वितरणाची मुदत वाढवली

मुंबई : राज्यातील लाखो शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर महाराष्ट्रातील स्वस्त धान्य दुकानांमधून धान्य वितरणाची मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप धान्य न मिळालेल्या लाखो लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यापूर्वी धान्य वितरणाची अंतिम मुदत १५ जून निश्चित करण्यात आली होती. मात्र, त्या कालावधीत राज्यातील सुमारे ७५ टक्के लाभार्थ्यांपर्यंतच धान्य पोहोचले होते, तर जवळपास २५ टक्के लाभार्थी विविध कारणांमुळे धान्यापासून वंचित राहिले होते. कोणताही पात्र लाभार्थी धान्यापासून वंचित राहू नये, यासाठी मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्र सरकारकडे मुदतवाढीची मागणी केली होती. त्यांच्या या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत केंद्राने धान्य वितरणासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ मंजूर केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे धान्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, उद्यापासून स्वस्त धान्य दुकानांमधून पुन्हा वितरण प्रक्रिया सुरू होणार आहे.

### "खरं की काय"




# जालान नगरमधील 'तिरुपती सुप्रीम इन्क्लेव'मध्ये तब्बल 24 तास वीज गुल; संतप्त नागरिकांनी महावितरणला धरले धारेवर

## माजी खासदार, महापौरांसह उच्चपदस्थांच्या सोसायटीत पाण्यासाठी हाहाकार; दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी






**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील जालान नगर भागातील अत्यंत उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या 'तिरुपती सुप्रीम इन्क्लेव' सोसायटीमध्ये महावितरणचा (MSEB) अत्यंत बेजबाबदार आणि निराशाजनक कारभार समोर आला आहे. या सोसायटीचा विद्युत पुरवठा दुपारी तीन वाजेपासून सलग बावीस ते चोवीस तास खंडित होता. धक्कादायक बाब म्हणजे, वीज गुल झाल्यानंतर त्रस्त झालेल्या नागरिकांनी महावितरणच्या कार्यालयात वारंवार फोन केले, मात्र अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी फोन उचलून कोणताही प्रतिसाद दिला नाही. शेवटी संतप्त झालेल्या सोसायटीच्या सदस्यांनी थेट महावितरणचे कार्यालय गाठून अधिकाऱ्यांना जाब विचारला. नागरिकांचा रोष पाहिल्यानंतर कुठे महावितरणच्या प्रशासनाला जाग आली आणि त्यांनी वीज पुरवठा खंडित का झाला, याचा शोध सुरू केला.

या उच्चभ्रू सोसायटीमध्ये माजी खासदार, महापौर, अनेक आजी-माजी शासकीय अधिकारी आणि प्रतिष्ठित कर्मचारी मोठ्या संख्येने राहतात. एवढ्या मोठ्या पदांवरील व्यक्ती राहत असलेल्या ठिकाणी वीज पूर्ववत होण्यासाठी पूर्ण एक रात्र आणि एक दिवस (बावीस ते चोवीस तास) का लागावा, असा संतप्त प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. सलग चोवीस तास वीज नसल्यामुळे संपूर्ण सोसायटीमधील पाणी पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला होता. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी व इतर वापराच्या पाण्यासाठी प्रचंड हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. याशिवाय दूरदर्शन (टीव्ही) बंद पडले, घरातील वॉटर प्युरिफायर (आरओ) सिस्टीम बंद झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. तसेच आधुनिक काळातील इलेक्ट्रिक गाड्यांचे चार्जिंग पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे अनेक नोकरदारांना आणि नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले होते. या अशा अनेक गंभीर गैरसोयींमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण होते.

सोसायटीच्या सदस्यांनी सांगितले की, आम्ही सर्व नागरिक नियमित आणि वेळेवर वीजबिल भरतो. प्रामाणिकपणे वीजबिल भरूनही जर महावितरणकडून अशी निराशाजनक आणि कासवगतीची कारवाई होत असेल, तर ग्रामीण भागातील किंवा शहरातील सर्वसामान्य माणसाचे काय हाल होत असतील, असा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर ग्राहकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि चोवीस तास वीज गुल ठेवण्यास कारणीभूत ठरलेल्या दोषी कर्मचाऱ्यांचा महावितरणने तात्काळ शोध घ्यावा आणि त्यांच्यावर कडक प्रशासकीय कारवाई करावी, अशी जोरदार मागणी तिरुपती सुप्रीम इन्क्लेव सोसायटीच्या वतीने करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील मान्यवरांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव; पद्म पुरस्कार प्रदान





**नवी दिल्ली, दि. २४ :** देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेल्या पद्म पुरस्कार २०२६ प्रदान सोहळ्यात महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू (Droupadi Murmu) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कला, वैद्यकशास्त्र, व्यापार-उद्योग आणि क्रीडा क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींना यंदा पद्म पुरस्कारांनी गौरविण्यात आले. महाराष्ट्रातून ज्येष्ठ गायिका अल्का यागनीक (Alka Yagnik) यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. पद्म पुरस्कार हे विविध क्षेत्रांतील असामान्य कार्य, समर्पण आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करणारे प्रतिष्ठित राष्ट्रीय सन्मान मानले जातात. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांच्या कार्याचा गौरव करताना देशभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पद्मश्री पुरस्कार विजेते : सतीश शाह – कला (मरणोत्तर) भिकल्या लाडक्या ढिंडा – कला डॉ. आर्मिडा फर्नांडिस – वैद्यकशास्त्र डॉ. अशोक खाडे – व्यापार आणि उद्योग माधवन रंगनाथन – कला रोहित शर्मा – क्रीडा

पद्म पुरस्कार हे विविध क्षेत्रांतील असामान्य कार्य, समर्पण आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करणारे प्रतिष्ठित राष्ट्रीय सन्मान मानले जातात. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांच्या कार्याचा गौरव करताना देशभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मरणोत्तर पुरस्कार प्राप्त करणाऱ्या मान्यवरांना यावेळी विशेष अभिवादन करण्यात आले. त्यांचा वारसा आणि योगदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त करण्यात आली.

# विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे

## कोणताही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही - मुख्य निवडणूक अधिकारी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्याचे अप्पर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले.

कोणताही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विभागातील जिल्हाधिकाऱ्यांच्या आढावा व मार्गदर्शन बैठकीत ते बोलत होते. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोगाने ही मोहीम हाती घेतली असल्याचे सांगत चोक्कलिंगम यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी मदत कक्ष स्थापन करून वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) आणि स्वयंसेवक यांना विश्वासात घेऊन मोहीम प्रभावीपणे राबवावी. भारतीय संविधान, लोकप्रतिनिधी कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निर्णयांचा अभ्यास करून कायदेशीर तरतुदींनुसार कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही, तसेच अपात्र नोंदींची काटेकोर छाननी करूनच आवश्यक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत मतदान केंद्रनिहाय उद्दिष्टे निश्चित करणे, मतदार यादी मॅपिंगला गती देणे, आवश्यक मनुष्यबळ, प्रशिक्षण, पडताळणी प्रक्रिया आणि अर्ज व्यवस्थापन यासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्जांचे वितरण व संकलन करणार आहेत. यादरम्यान मतदारांची माहिती, नाव, पत्ता, छायाचित्र यातील विसंगतींची पडताळणी केली जाईल. तसेच अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा डुप्लिकेट नोंदींची तपासणी करून मतदार यादी अधिक अचूक करण्यावर भर दिला जाणार असून संकलित माहितीचे डिजिटल अद्ययावतीकरण वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# एस.टी. कामगारांच्या लढ्याला यश! 58% महागाई भत्ता आणि सुधारित घरभाडे भत्ता मंजूर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MSRTC) लाखो कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी उभारण्यात आलेल्या राज्यव्यापी आंदोलनाला अखेर मोठे यश आले आहे. 'संयुक्त कृती समिती'च्या नेतृत्वाखाली पुकारलेल्या या लढ्यापुढे झुकत प्रशासनाने कामगारांच्या वेतन आणि भत्त्यांमध्ये घसघशीत वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कोणत्याही प्रकारचे हिंसक आंदोलन न करता, महामंडळाचे किंवा सार्वजनिक मालमत्तेचे कसलेही नुकसान न करता केवळ कायदेशीर व शांततापूर्ण मार्गाने मिळवलेला हा विजय एस.टी. कामगारांच्या एकजुटीची ताकद दाखवून देणारा ठरला आहे. गेल्या काही दिवसांपासून कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी राज्यभरात घंटानाद, महाआरती आणि "जवाब दो" आंदोलनाच्या माध्यमातून तीव्र संताप व्यक्त केला जात होता. या आंदोलनाची गंभीर दखल घेत राज्याचे मंत्री प्रतापरावजी सरनाईक यांनी तातडीने एक उच्चस्तरीय बैठक बोलावली. या बैठकीत संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून कामगारांच्या हिताचे तीन मोठे निर्णय जाहीर करण्यात आले. या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, राज्यात कुठेही चक्का जाम किंवा प्रवाशांना वेठीस धरण्याचा प्रकार घडला नाही. कामगारांनी



कामावर हजर राहून, केवळ निदर्शने करून प्रशासनाला तब्बल ४६ कोटी रुपयांची देणी अदा करण्यास भाग पाडले. एस.टी.चे कसलेही नुकसान न होऊ देता हा कायदेशीर लढा यशस्वी केल्याबद्दल, मान्यताप्राप्त कामगार संघटनेचे सरचिटणीस ताटे आणि राज्याध्यक्ष संदीप शिंदे यांचे महामंडळाच्या प्रत्येक स्तरातून, आगार पातळीवरून आणि कामगार वर्गातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

**बैठकीतील ३ महत्त्वाचे निर्णय आणि अंमलबजावणी:** मंत्र्यांसोबत झालेल्या सकारात्मक बैठकीत खालील मुद्द्यांवर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, या सर्व निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी जुलै देय ऑगस्ट २०२६ च्या वेतनापासून केली जाणार आहे.

**महागाई भत्त्यात (DA) ५८% वाढ:** एस.टी. कर्मचाऱ्यांना आता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर पूर्ण ५८% महागाई भत्ता लागू केला जाणार आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनात मोठी वाढ होणार आहे.

**सुधारित घरभाडे भत्ता (HRA) मंजूर:** कर्मचाऱ्यांच्या निवासाचा प्रश्न लक्षात घेऊन शहरांच्या वर्गीकरणानुसार १०%, २०% आणि ३०% या सुधारित दराने घरभाडे भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**३% वार्षिक वेतनवाढ (Increment):** १ एप्रिल २०१६ पासून प्रलंबित असलेली ३% दराने वार्षिक वेतनवाढ अखेर मंजूर करण्यात आली आहे. ऑगस्ट २०२६ च्या पगारात ही वाढ प्रत्यक्ष जोडली जाईल.

**४४.६६ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक लाभ :** या त्रिसूत्री निर्णयामुळे राज्यभरातील एस.टी. कामगारांना एकूण ४४.६६ कोटी रुपयांची आर्थिक वाढ मिळणार आहे. प्रशासनावर पडणारा हा आर्थिक भार कामगारांच्या हक्काचा मोबदला असल्याचे कृती समितीने म्हटले आहे

### मुख्यमंत्री यांच्या पुढाकारातून कैद्यांचे यशस्वी पुनर्वसन

**मुंबई :** गुन्हेगारीचा रस्ता सोडून कैद्यांनी पुन्हा एकदा समाजाच्या प्रवाहात यावे. भूतकाळ विसरून सन्मानाने जीवन जगावे आणि त्यांच्या कुटुंबालाही स्थैर्य मिळावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यातील विविध कारागृहांमध्ये कैद्यांच्या पुनर्वसनासाठी विशेष उपक्रम राबविला जात आहे. यासाठी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' संस्थेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमातून कैद्यांना गुन्हेगारी जग सोडून सकारात्मक आयुष्याची कास धरण्यासाठी मोठे मानसिक आणि सामाजिक बळ मिळत आहे.

# पाण्याखाली दडलेले 'मृत्यूचे सापळे'; प्रशासन वाट पाहत आहे अपघात होण्याची?

## जलवाहिनी व पाईपलाईन कामांसाठी खोदलेले खड्डे पहिल्याच पावसात जलमय

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील विविध भागांत जलवाहिनी टाकणे आणि जुन्या पाईपलाईनच्या दुरुस्तीची कामे सुरू असताना खोदण्यात आलेले खोल खड्डे पहिल्याच पावसात पाण्याखाली गेल्याने नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. पावसाच्या पाण्याखाली दडलेले हे खड्डे आता अक्षरशः 'मृत्यूचे सापळे' बनले असून, एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार?, प्रशासन अपघात झाल्याशिवाय उपाय योजना करत नाहीत ते अपघात होण्याची वाट पाहत असल्याचे संतप्त नागरिकांकडून बोलले जात आहे.

शहरातील अनेक भागांत जलवाहिनी आणि पाईपलाईनच्या कामांसाठी रस्त्यालगत मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यात आले आहे. मात्र पावसाळा सुरू झाल्यानंतर या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून ते वरून सामान्य पाणथळीसारखे वाहत आहेत. प्रत्यक्षात त्याखाली किती खोल खड्डा आहे, याचा अंदाज नागरिकांना येत नसल्याने दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक, पादचारी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे.

विशेष बाब म्हणजे अनेक ठिकाणी सुरक्षेसाठी आवश्यक असलेले बॅरिकेड्स, परावर्तित फलक, इशारा सूचना किंवा रात्रीच्या प्रकाशव्यवस्थेचा पूर्णपणे अभाव आहे. काही ठिकाणी केवळ औपचारिकता म्हणून फीत बांधण्यात आली असली तरी ती अपघात रोखण्यासाठी पुरेशी नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

दैनिक हिंदू प्रकाश वार्तानं यापूर्वीही शहरातील रस्त्यांची दुरवस्था, अर्धवट खोदकामे आणि नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित प्रश्न सातत्याने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. मात्र वारंवार वृत्त प्रसिद्ध होऊनही संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने दखल घेतलेली दिसत नाही. परिणामी आजही अनेक भागांत नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत.

सायंकाळनंतर आणि रात्रीच्या वेळी परिस्थिती आणखी गंभीर बनत आहे. अंधारामुळे खड्डे स्पष्ट दिसत नाहीत. पावसाचे पाणी साचल्याने रस्त्याचा आणि खड्ड्याचा फरक ओळखणे कठीण होत आहे. अशा परिस्थितीत एखादे वाहन घसरून खड्ड्यात गेल्यास किंवा एखादा नागरिक त्यात पडल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक नागरिकांच्या मते, पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित असलेली अनेक कामे अद्याप रखडलेली आहेत. खोदकाम करून रस्ते अर्धवट अवस्थेत सोडण्यात आल्याने वाहतुकीसह नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस आहे चौका चौकात मोठे खड्डे खोदून ठेवले आहे. पाण्याखाली किती खोल खड्डा आहे हे समजत नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, शाळकरी मुलं, महिला, दुचाकीस्वार, फोर व्हीलर वाला त्या ठिकाणी पडल्यास मोठे दुर्घटना होऊ शकते. सुरक्षाच्या दृष्टिकोनातून त्या ठिकाणी बॅरिकेट्स किंवा सूचना फलक लावावे.

— स्थानिक रहिवासी

"रात्रीच्या वेळी या मार्गाने जाणे धोकादायक झाले आहे. लांबून काही दिसत नाही जवळ आल्यानंतर कळतंय की या ठिकाणी खड्डा आहे. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात जलवाहिनीसाठी खड्डे खोदण्यात आले आहे. त्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था म्हणून बॅरिकेट्स किंवा सूचनाफलक लावावे.

— दुचाकीस्वार

### 'दुर्घटना झाल्यास जबाबदार कोण?'

शहरभर सुरू असलेल्या जलवाहिनी आणि पाईपलाईन कामांमुळे निर्माण झालेली ही परिस्थिती केवळ गैरसोय नसून संभाव्य जीवितहानीचा इशारा आहे. नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा कामांची अपुरी आखणी आणि निष्काळजीपणा अधिक ठळकपणे दिसून येत आहे. चौका चौकात मोठ्या प्रमाणात खड्डे खोदून ठेवले आहे उद्या एखादा निष्पाप नागरिक या खड्ड्यात पडून जखमी झाला किंवा जीवितहानी झाली, तर त्याची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी कोण स्वीकारणार? हा प्रश्न आता प्रत्येक नागरिक प्रशासनाला विचारत आहे.

### हिंदू प्रकाशवार्ताची ठाम मागणी

शहरातील सर्व खोदकामांच्या ठिकाणी तात्काळ मजबूत बॅरिकेड्स, परावर्तित इशारा फलक, रात्रीची प्रकाशव्यवस्था आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात. संभाव्य दुर्घटना घडण्याची वाट न पाहता महानगरपालिका प्रशासन, संबंधित विभाग आणि ठेकेदारांनी त्वरित खड्ड्याच्या आजूबाजूला बॅरिकेट्स, इशारा फलक लावावे आणि नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करावे.

# संपादकीय

## नेत्यांच्या स्मारकांपेक्षा रुग्णालये आणि शाळांचीच गरज!

देशातील आणि राज्यातील राजकारणाचा स्तर दिवसेंदिवस खालावत असताना, केवळ राजकीय नेत्यांची किंवा महापुरुषांची भव्य स्मारकं उभारून मतांचे राजकारण करण्याची जणू चढाओढच लागली आहे. अशा परिस्थितीत स्मारकांऐवजी शाळा आणि रुग्णालये उभारा, अशी जनहिताची भूमिका घेणे म्हणजे थेट राजकीय रोष ओढावून घेणे ठरते. छत्रपती संभाजीनगर येथील जालना रोडवरील शासकीय दूध डेअरीच्या जागेवर एका दिवंगत नेत्याचे स्मारक उभारले जात असताना, त्याला विरोध करून तिथे महिला व बाल रुग्णालय उभारण्याची मागणी तत्कालीन लोकप्रतिनिधींनी केली होती. आज अनेक वर्षांच्या तीव्र संघर्षानंतर आणि कायदेशीर लढ्यानंतर अखेर तिथे भव्य सुसज्ज रुग्णालय उभे राहत असून, शासनाने त्यासाठी साडेतीनशेहून अधिक वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी दिली आहे. हा निर्णय म्हणजे केवळ एका नेत्याच्या लढ्याचा विजय नाही, तर तो या राज्यातील लोकहिताच्या राजकारणाचा आणि सामान्य जनतेचा मोठा विजय आहे. कोणत्याही शहराचा विकास हा तिथे असणाऱ्या आरोग्य आणि शिक्षण सुविधांवरून ठरत असतो. शासकीय जमिनी या जनतेच्या कल्याणासाठी आणि गरिबांच्या हक्काच्या सुविधांसाठी वापरल्या गेल्या पाहिजेत, हा लोकशाहीतील मूळ नियम आहे. जेव्हा सरकारी जमिनींचा वापर केवळ एखाद्या राजकीय पक्षाला फायदा होणाऱ्या स्मारकांसाठी केला जातो, तेव्हा लोकप्रतिनिधींनी त्याविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे असते. तत्कालीन आमदार आणि खासदारांनी घेतलेली सडेतोड भूमिका हीच होती की, जर स्मारके उभारायची असतील तर राजकीय नेत्यांनी स्वतःच्या किंवा पक्षाच्या खर्चातून जमीन खरेदी करावी, त्यासाठी सरकारी तिजोरी आणि जमिनींचा वापर होऊ नये. ही भूमिका मांडताना त्यांना अनेक धमक्या, शिव्या आणि टोमणे सहन करावे लागले. इतकेच नव्हे तर 'पाकिस्तानात जाऊन रुग्णालय बांधा' अशा प्रकारची खालच्या पातळीची टीकाही त्यांच्यावर करण्यात आली. परंतु, जनहिताचा ध्यास असेल तर कोणत्याही राजकीय दबावाला न जुमानता लढा कसा दिला जातो, हे या उदाहरणावरून सिद्ध होते. जेव्हा सत्ताधारी राजकारण्यांनी विधानसभेत आणि प्रशासकीय पातळीवर या मागणीची खिल्ली उडवली, तेव्हा लोकप्रतिनिधींना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करावी लागली. न्यायालयानेही शहराची आरोग्यविषयक गरज ओळखली आणि स्मारकाची ती जमीन रुग्णालयासाठी हस्तांतरित करण्याचे ऐतिहासिक आदेश दिले. न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळेच आज चारशे खाटांचे भव्य महिला व बाल रुग्णालय अंतिम टप्प्यात आले आहे. हे रुग्णालय कोणत्याही आमदार किंवा खासदारांसाठी नसून, ज्या गरीब नागरिकांना खाजगी रुग्णालयांमधील महागडे उपचार परवडत नाहीत, त्यांच्यासाठी संजीवनी ठरणार आहे. या संपूर्ण लढ्यात आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे, ज्या वकिलांनी हा खटला मोफत लढवला, ते आज उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत, जे या लढ्याची न्यायालयीन पवित्रता स्पष्ट करते.

## "महाराष्ट्राला फितुरी नवी नाही.!"

महाराष्ट्र राज्याचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वर सारखा महान संत मिळाला, सतराव्या शतकात संत तुकाराम मिळाले. ,आणि अत्यंत महत्वाची बाब म्हणजे सतराव्या शतकातच महान योध्दा ज्यांचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे असे छत्रपती शिवाजी महाराज ह्यांनीच ह्या मराठी परिणामी हिंदू साम्राज्याची पहिली विट ठेवली. पुढे आठ छत्रपती आणि नऊ पेशव्यांनी ह्या मराठीशाहीचा भगवा पताका, अहद तंजावर तहद पेशावर पर्यंत पोचवला, (हा विस्तार मराठा साम्राज्याच्या अफाट सत्तेची आणि पराक्रमाची साक्ष देतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून सुरू झालेली स्वराज्य सीमा पेशवेकाळात अटकेपार (पेशावर) आणि दक्षिणेत तंजावरपर्यंत विस्तारली. या प्रचंड साम्राज्याचा गौरव करण्यासाठी हा शब्दप्रयोग केला जातो. "दक्षिण भारतातील तंजावर तामिळनाडू, ते वायव्ये कडील सध्याच्या पाकिस्तानातील पेशावर.") थोरल्या बाजीराव सारखा अपराजित योद्धा ह्याच राज्याला मिळाला. सांस्कृतिक दृष्टीने हे राज्य अनेक सन उत्सवांसाठी प्रसिद्ध आहे. गणेश उत्सव इथला प्रचंड लोकप्रिय उत्सव आहे तर लावणी इथला मुख्य कलाविष्कार आहे. जगातील सर्वात मोठी फिल्म इंडस्ट्री ह्याच महाराष्ट्रात आहे. वडा पाव, मिसळ पाव, पुरण पोळी, पिठलं भाकरी, हे इथले मुख्य व्यंजन आहेत. गोदावरी, कृष्णा, भीमा, वैनगंगा, तापी, पूर्णा, नर्मदा ह्या प्रमुख नद्या, अनेक चांगले हिल्स स्टेशन आहेत. मुंबई सारखं महानगर ह्याच राज्यात महाराष्ट्राला शोभणार आहे. पू.ल. देशपांडे, वी.स. खांडेकर, अण्णाभाऊ साठे, आचार्य अत्रे, दुर्गा भागवत, व.पु. काळे, आदी मोठे साहित्यिक लाभले, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब भीमराव आंबेडकर ह्यांची कर्मभूमी महाराष्ट्र राहिली आहे. यशवंतराव चव्हाण, स.का. पाटील, शरदराव पवार, बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन, नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस सारखी मोठी राजकीय नेते मंडळी देखील ह्याच महाराष्ट्राने जन्माला घातली. जागतिक कीर्तीचे संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देखील ह्याच महाराष्ट्राची देन आहे, त्यात डॉ हेडगेवार, श्री गोळवकलकर गुरूजी, ही सामाजिक अभिसरण जपणारी मंडळी महाराष्ट्राने भारताला आणि जगाला दिली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर सारखा दैदिप्यमान योध्दा ह्याच राज्याने दिला आहे. बरेच काही आदर्श राज्याने दिले आहेत. हे जसे महाराष्ट्राने आदर्श अशी परंपरा देशाला आणि जगाला दिली आहे तशीच दुर्देवी "फितुरी ही मोठी शोकांतिका देखील महाराष्ट्राने भारताला मोठ्या प्रमाणात दाखवली आहे. पार छत्रपती शिवाजी महाराजांपासून सुरू झालेली फितुरी छत्रपती संभाजी महाराज, ते थोरले बाजीराव, थोरले माधवराव पेशवा ते सवाई माधवराव पेशवे आणि आज पर्यंत महाराष्ट्राला हा फुटीचा श्राप कायम आहे...

मराठीशाही (मराठा साम्राज्य आणि पेशवेकाळ) च्या इतिहासात वैयक्तिक स्वार्थ, वतने आणि सत्तेच्या लालसेपोटी फितुरी आणि गद्दारी करणाऱ्या अनेक सरदारांचा उल्लेख येतो. गणोजी शिर्के छत्रपती संभाजी महाराजांचे मेहुणे. संगमेश्वर येथे संभाजी महाराजांवर अचानक मुघलांनी हल्ला केला, तेव्हा स्थानिक भूगोलाची अचूक माहिती देऊन मुघल सरदार शेख निजाम याला फितुरीने माहिती पुरविल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. सूर्याजी पिसाळ रायगडावरील किल्लेदार. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात मुघलांनी जेव्हा रायगडला वेढा दिला, तेव्हा लाच व वतनासाठी सूर्याजी पिसाळाने गडाचे दरवाजे मुघलांसाठी उघडून दिले, असा ऐतिहासिक संदर्भ पिसाळचा बाबतीत दिला जातो. खंड्या खोपडे, बाजी पासलकर आणि स्वराज्यातील इतर सरदारांच्या विरोधात जाऊन, आदिलशाही फौजांना स्वराज्याची गुप्त माहिती आणि फितुरीची मदत केल्याचा उल्लेख यांच्याबाबत येतो. छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्यकारभारात अनाजी पंतांची भूमिका कायमच संशयास्पद राहिली आहे. हे ही आपण लक्षात घेतले पाहिजे. ह्या सर्व फितुरांच्या अगोदर स्वराज्य संकल्पक शहाजी राजांच्या सोबतही जगदेवराव जाधव ह्यांची फितुरी आपल्याला माहिती आहे. पेशवेकालीन इतिहासात दामाजी जाधव हे देखील त्याच यादीत येतात, साताऱ्याच्या गादीवर चढाई करण्यासाठी महाराणी ताराबाईंच्या सांगण्यावरून दामाजी जाधवराव यांनी फौजेसह चाल केली होती, ज्याला फितूर घोषित करण्यात आले होते. असा इतिहास आहे. मराठी इतिहासातील 'पेशवाई'च्या काळात अंतर्गत फितुरीमुळे मराठा साम्राज्याला अनेकदा मोठी किंमत मोजावी लागली. पेशवाईच्या अस्तास कारणीभूत ठरलेल्या आणि महत्त्वाच्या प्रसंगी फितुरीच कारणीभूत ठरल्या आहेत. रघुनाथराव पेशवे (राघोबादादा) सत्तेच्या हव्यासापोटी रघुनाथरावांनी स्वतःच्याच पुतण्याचा (नारायणराव पेशव्यांचा) खून घडवून आणण्यासाठी मारेकरी बोलावल्याचा आरोप आहे. पेशवेपद मिळवण्यासाठी त्यांनी थेट मराठ्यांच्या कट्टर शत्रू असलेल्या इंग्रजांची मदत घेतली, ज्यातून 'पहिला इंग्रज-मराठा युद्ध' झाले आणि मराठा साम्राज्याच्या अस्ताची सुरुवात झाली.(सुदैवाने आजचे राजकारण खूनापर्यंत अजून आले नाही ह्याचा आनंद आहे) आनंदीबाई (रघुनाथरावांच्या पत्नी) नारायणराव पेशव्यांच्या हत्येच्या प्रकरणात आनंदीबाईंचा मुख्य हात होता, असे अनेक इतिहासकारांचे मत आहे. 'धरा' (पकडा) या शब्दाचा 'मारा' असा अर्थ बदलून त्यांनी नारायणरावांचा खून घडवून आणला, ज्यामुळे पेशव्यात अंतर्गत कलह आणि अस्थिरता निर्माण झाली. (काही इतिहासकारांच्या मते हा कट गारद्यांनी अगोदरच घडून आणला होता, नंतर तो आनंदीबाई ह्यांच्यावर लोटला असंही मत आहे.) त्र्यंबकजी डेंगळे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात हा एक अत्यंत महत्त्वाचा परंतु कारस्थानी अधिकारी होता. त्याने इंग्रजांच्या विरुद्ध कारवाया केल्या, फितुरी केली आणि नंतर इंग्रजांशी झालेल्या युद्धात पेशव्याला योग्य वेळी साथ न देता पेशवाई बुडवण्यास अप्रत्यक्षपणे मदत केली. सखाराम बापू बोकील हे पेशवे दरबारातील अत्यंत ज्येष्ठ मुत्सद्दी होते. परंतु, पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाच्या वेळी आणि राघोबादादांच्या कारस्थानांमध्ये त्यांची भूमिका संशयास्पद आणि दुतोंडी राहिली. त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी वारंवार गट बदलले. अनेक सरदार व अनेक जहागीरदार पानिपतच्या युद्धानंतर आणि पेशवाईच्या उत्तरार्धात, शिंदे, होळकर आणि गायकवाड यांसारख्या मोठ्या सरदारांनी आपापले स्वतंत्र राज्य वाचवण्याच्या नादात मध्यवर्ती पेशव्यांना पूर्ण पाठिंबा दिला नाही. अनेक सरदारांनी ऐनवेळी इंग्रजांशी संधान साधले, ज्यामुळे मराठा सत्तेची ताकद विभागली गेली. फितुरी वारंवार राजकीय संघर्ष, सत्ता लालसा, राजकीय डावपेच, वतने टिकवणे, सत्ता टिकवणे, अंतर्गत कलह ही फितुरीची प्रमुख कारण होती, ज्याचा फायदा मुघल व आदिलशाहीने घेतला. आणि परिणामी मराठेशाही समाप्तीकडे आली...

आजही राजकारणात सत्तेसाठी, पैशासाठी, स्वतःच अस्तित्व सांभाळण्यासाठी, स्वतःच घर सांभाळण्यासाठी ज्यांनी मोठे केले त्यांच्या सोबत फितुरी करणारी मंडळी दिसत असतात. आमदार खासदार मंत्री सोडा हो, राज्याचा प्रमुख ज्यांना केलं होतं त्यांनी देखील राजकीय फितुरी केली आहेच की. तेंव्हाही कारण वेगवेगळी होती, फितूरीच समर्थन करणारी मंडळी तेंव्हाही होती, आजही आहेत. शब्द बदलले आहेत, भावना आणि सत्य हे तेच आहे. सेनेचा प्रमुख चुकीचा आहे म्हणून सैनिकांनी बंड इतिहासात देखील केलंच आहे. तर सैनिकांचा सेनापतीला योग्य असताना बंड करणं हा ही इतिहास घडला आहेच. हिंदी मध्ये एक म्हण आहे "इतिहास अपने आप को दोहराता है". कदाचित हेच सत्य आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाने सर्व पाहिले आहे. पुतण्याने पक्ष पळवला, मुलगा वेंधळा निघाला, निमसेनापतीने बंड करून सेनापतीचा पक्ष काबीज केला, पुतण्या फितूर झाला. पुतण्या पेक्षा मुलीला प्राधान्य दिलं, आपला माणूस परवडत नाही म्हणून चक्क जम्मू काश्मीर चां आपल्या मतदार संघातून निवडून आणला. मित्राला नामोहरम करण्यासाठी त्याच्या विरोधात बायकोला उभ केलं, ती बायको नंतर आपल्या राजकारणाला परवडत नाही म्हणून थेट स्वतः मुख्यमंत्री असताना पंतप्रधानांना बायकोच्या प्रचाराला जाऊ नका म्हणून सांगितल. सर्व कट कारस्थान महाराष्ट्राने देशाला दाखवली आहेत. आज घडत असलेलं कोणतही कारण शे दोनशे तीनशे वर्ष अगोदर ह्याच राज्याने त्याच्या इतिहासाने पाहीली आहेत. इतिहास अभ्यासकांना आजची राजकीय कारस्थान किंवा आजच्या राजकीय फितूर्या नव्या वाटत नाहीत, कारण ह्यापेक्षा भयानक फितुर्या राज्याच्या प्रमुखा सोबत झालेल्या आहेत. मराठी साम्राज्यात पुतण्याच्या चक्क जीव घेऊन काटा काढल्याचा इतिहास आहे, सुदैवाने असं राजकारण अजूनतरी झालेले नाही, नाहीतरी हे चांगल म्हणायची वेळ आहे. पण इतिहासातील फितुरी मुळे आदीलशहीने, आणि निजामशाहिने त्याचा फायदा करून घेतला होता, आणि आपण पुन्हा पराधीन झालो. जे की पुढील काही शतकं. तसाच सध्याच्या फितुरी मुळे महाराष्ट्राच्या लौकिकाला भारताच्या राजकारणात काळीमा वाढत आहे आणि हे महाराष्ट्राला न परवडणारं आहे. कारण महाराष्ट्राने देशाल अनेक लौकिक दिले आहेत. बाकी चूक कोण आणि बरोबर कोण ह्याचे उत्तर काळ आणि सत्य इतिहास देत असतो, आपण माणसांनी ते प्रयत्न करू नयेत. थोरल्या पेशव्यांनी छत्रपतींना आपला राजा मानत अटकेपार भगवा रोवला, पण त्यांना जास्त इतिहासकारांनी मस्तानी बाई पुरतच मर्यादित केलं, खरा इतिहास हा सत्य आणि वस्तुनिष्ठ माहिती घेऊन कळतो, तसाच ह्या असल्या राजकीय विषयातील खऱ्या बाबी त्या वर्तुळातील प्रामाणिक व्यक्तीकडून समजून घेतल्या पाहिजेत. आपण सामान्यांनी त्यावर जास्त चर्वण न करता, इतिहासातून काही शिकून पुढचं पाऊल सावध टाकावे इतक्यासाठीच हा प्रपंच... तूर्तास्त इतकंच...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगावकर.**

## पिंपरी गुमसताळा येथील 'जल जीवन'च्या अपूर्ण कामांविरोधात जि. प.'अर्ध-मुंडण' आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर :** जल जीवन मिशन अंतर्गत पिंपरी गुमसताळा गावातील पिण्याच्या पाण्याची अपूर्ण राहिलेली कामे तात्काळ सुरू करून ती पूर्ण करण्यात यावीत, या मागणीसाठी उद्या ग्रामस्थांच्या वतीने एक अनोखे आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येणार आहे. गुरुवार, दिनांक २५ जून रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासमोर हे 'अर्ध-मुंडण' आंदोलन केले जाणार आहे. प्रशासनाच्या धीम्या कारभारामुळे गावकऱ्यांना पाण्यासाठी सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांकडे लक्ष वेधण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

या आंदोलनाची रणनीती अत्यंत आक्रमक ठेवण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासमोर आंदोलक आपले अर्ध-मुंडण करतील. त्यानंतरही प्रशासनाने दखल न घेतल्यास, उर्वरित अर्ध-मुंडण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्या मुख्य दालनासमोर करून प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला जाणार आहे. "पाणी हा आमचा हक्क आहे, कोणाचे उपकार नाहीत" अशी संतप्त भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. "जल जीवन मिशनचे काम पूर्ण झालेच पाहिजे!" आणि "गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळालेच पाहिजे!" अशा घोषणा देत पिंपरी गुमसताळा गावातील पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी हे आंदोलन निर्णायक ठरणार आहे. गावातील प्रलंबित विकासकामांवरून प्रशासनाला जागे करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले असून, यामुळे जिल्हा परिषद वर्तुळात खळबळ उडाली आहे. आपल्या हक्काच्या पाण्यासाठी आणि गावाच्या विकासासाठी पुकारण्यात आलेल्या या हक्काच्या लढ्यात पिंपरी गुमसताळा गावातील सर्व ग्रामस्थ, तरुण वर्ग आणि नागरिकांनी कोणत्याही पक्षाचा, गटातटाचा विचार न करता उद्या गुरुवारी सकाळी ठीक ११ वाजता जिल्हा परिषद कार्यालयात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, तसेच या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देऊन प्रशासनाला जाब विचारावा, असे आग्रहाचे आवाहन आंदोलनकर्ते व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कामात हलगर्जीपणा सहन करणार नाही : सीइओ

### प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय आढावा




**जालना, दि. २४ :** केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक तत्परतेने काम करणे आवश्यक आहे. कामात हायगय करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवरीया यांनी दिला.

अंबड येथे आयोजित अंबड व घनसावंगी तालुक्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रकल्प संचालक डॉ. सुनील पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप पवार, मुख्य वित्त व लेखा अधिकारी राधाकिशन राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, जिल्हा कृषी अधिकारी पी. बी. बनसवडे तसेच पद्मा मांझरे उपस्थित होते.

पंचायत समिती कार्यालयांमध्ये आयोजित बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा आणि शासन योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. घरकुल योजना व मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या कामातील प्रगतीबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना १५ दिवसांत सुधारणा करण्याची मुदत दिली.

बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल योजना, पंचायत विभाग, स्वच्छ भारत मिशन, उमेद अभियान, जल जीवन मिशन, आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, कृषी, लेखा विभाग तसेच मनरेगा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाडी केंद्रे, ग्रामपंचायत कार्यालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच जलकवच अभियानांतर्गत सर्व शासकीय कार्यालयांवर रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याने आगामी १५ दिवसांत हे काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

बैठकीस अंबड गट विकास अधिकारी ज्योती कवडदेवी, घनसावंगी गट विकास अधिकारी प्रदीप कदम, सहाय्यक गट विकास अधिकारी समीर जाधव, जनसंपर्क अधिकारी भगवान तायड यांच्यासह तालुकास्तरीय विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय व्यसनमुक्ती कार्यशाळा संपन्न; 'नशामुक्त भारत' पुस्तिकेचे प्रकाशन अन् सामूहिक शपथ

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन व अवैध तस्करी विरोधी दिन तसेच नशामुक्त भारत अभियानाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच एक दिवसीय राज्यस्तरीय व्यसनमुक्ती कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाजकल्याण आयुक्तालय (पुणे), सहाय्यक आयुक्त कार्यालय (छत्रपती संभाजीनगर) आणि आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्र (बार्शी, जि. सोलापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने या महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे पार पडलेल्या या सोहळ्याला राज्यभरातून




आलेल्या विविध क्षेत्रांतील अभ्यासक आणि प्रतिनिधींची मोठी उपस्थिती लाभली होती. या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त आर. एम. शिंदे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सच्या पोलीस निरीक्षक श्रीमती गीता बागवडे यांच्यासह डॉ. संदीप तांबारे, डॉ. बालाजी जाधव आणि डॉ. कविता आंधारे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांच्या हस्ते 'नशामुक्त भारत अभियान मार्गदर्शक पुस्तिका' या अत्यंत उपयुक्त पुस्तिकेचे दिमाखात प्रकाशन करण्यात आले. ही पुस्तिका आगामी काळात समाजात व्यसनमुक्तीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अत्यंत दिशादर्शक ठरेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यशाळेच्या विविध सत्रांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांनी उपस्थितांना अमली पदार्थ विरोधी 'एनडीपीएस' (NDPS) कायद्याची कडक अंमलबजावणी, व्यसनमुक्तीच्या प्रवासात आवश्यक असणारा संतुलित आहार, संत साहित्यातून मिळणारा व्यसनमुक्तीचा शाश्वत संदेश, अल्कोहोलिक्स ॲनॉनिमसची जागतिक कार्यपद्धती, व्यसनाधीनतेतून बाहेर पडण्यासाठीचे मानसिक प्रशिक्षण आणि व्यसनप्रतिबंधक जीवनकौशल्ये अशा अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या सत्रांमुळे व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि वैद्यकीय प्रतिनिधींना नवीन दृष्टिकोन मिळाला. संपूर्ण कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन सौ. अनुपमा शेटे यांनी केले.

या राज्यस्तरीय कार्यशाळेत संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या २०० हून अधिक प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवत आपले अनुभव मांडले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सर्व अधिकारी, पाहुणे आणि उपस्थित प्रतिनिधींनी एकत्र येत समाज व्यसनमुक्त करण्याचा निर्धार करत सामूहिक व्यसनमुक्तीची शपथ घेतली.

## परभणी जिल्ह्यात अवैध धंदे व अमली पदार्थ तस्करीचे सिंडिकेट सक्रिय

### छाप्यात 16.20 लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** सध्या सर्वच अवैध धंद्यांनी जोर धरला असून पोलीस प्रशासनाचा धाक अवैध धंदेवाल्यावर राहिला नाही. सध्या प्रतिबंधित गुटखा गांजा आणि घातक अमल पदार्थाची( ड्रग ) खुलेआम तस्करी सुरू असून या काळ्याधंद्याने जिल्ह्यातील तरुण पिढीला व्यसनेच्या खाईत ढकलले आहे एकीकडे पोलीस प्रशासनातील तरुण तडफदार पोलीस अधीक्षक पंकज कुमावत हे परभणीच्या गुन्हेगारी जगतावर आपली पकड मजबूत करण्याचे प्रयत्न करत असताना दुसरीकडे मात्र ठाणे स्तरावरील पोलीस यंत्रणा हप्ते बाजीत गुंतली आहे प्रशासनाचे विदारक चित्र समोर आले आहे स्थानिक प्रशासनाच्या अवसान घाती कारभारामुळे अवैध धंदेवाल्यांना मिळालेल्या वरदहस्तामुळे नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या विशेषपथकाला सर्जिकल स्ट्राइक करून रात्रीचा गेम करावा लागला. जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा आणि अमली पदार्थाची तस्करी करण्यासाठी एक नवीन यंत्रणा विकसित केली आहे शहराच्या कानाकोपऱ्यात व गल्लीबोळात व ही आपली पदार्थाचे मुख्य केंद्र बनले आहेत गांजा व अमली पदार्थाचे विक्रेते आता उघडपणे फिरून शाळा व महाविद्यालयातील तरुणांना पर्यंत व्यसनाचे जाळे पसरले आहे पोलीस प्रशासनाने या ड्रग रॅकेटकडे जाणून बुजून अनदेखेपणा केल्यामुळे परभणी जिल्ह्यातील तरुण पिढी व्यसनाधीन होऊन मृत्यूच्या खाईत ढकली जात आहे डीआयजी च्या विशेष पथकाने जिल्ह्यात राबवलेली मोहीम धडक छाप्यामध्ये तब्बल 16 लाख 20 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच 42 आरोपी विरुद्ध 19 गुन्हे दाखल करून गुन्हेगारी जगतात मोठी खळबळ उडून दिली आहे परभणीपोलीस यंत्रणा अवैध धंदे वअमली पदार्थाची गुन्हेगारांना रोखण्यात आपयेशी व निकामी ठरली आहे ठरल्यानंतर नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांचे विशेष पथकाने थेट कारवाईचा बडगा उगारल्याने व या विशेष पथकाने जिल्ह्यातील संशयास्पद गोदामावर आणि छोट्या छोट्या पान टपऱ्या वर छापे टाकून तब्बल 15 लाख 38 हजार 391 रुपयाचा प्रतिबंधित गुटखा आणि मुद्देमाल हस्तगत केला व अमली पदार्थाच्या अड्ड्यावर छापेमारी करून 82 हजार चारशे रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला या संपूर्ण जिल्ह्याच्या कारवाईत अमली पदार्थाची नेटवर्क चालवणाऱ्या 19 सराईत गुन्हेगाराविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून त्यांची कोठडीत रवानगी करण्यात आली आहे एक मे रोजी पदभार स्वीकारलेल्या आयपीएस अधिकारी पंकज कुमार यांनी चुणूक दाखवत पूर्णा आणि जिंतूर येथील पोलीस निरीक्षकांना तडका फडके नियंत्रण कक्षाचा रस्ता दाखवून पोलीस प्रशासनात खळबळ उडवून दिली त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेत नियमबाह्य पद्धतीने

## बोरी अप्पर तहसील कार्यालयाची मागणी साठी पुरुषाचे मुंडन आंदोलनतर महिलाचा मशाल मोर्चा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** बोरी येथील अप्पर तहसील कार्यालयाच्या मागणीसाठी धरणे आंदोलनाला बसलेल्या तरुण व पुरुषांनी मुंडल आंदोलन केलं तर महिलांनी मशाल मोर्चा काढून या आंदोलनाचे समर्थन केले . याच दरम्यान या आंदोलनास बसलेल्या तरुणाची प्रकृती खालावल्याने परिस्थिती बिकट झाली होती. अप्पर तहसील कार्यालय लवकरात लवकर कार्यान्वित करावं या मागणीसाठी आंदोलन सुरू





असून गुरुवार दिनांक 18 जून रोजी पुरुषाने मुंडन आंदोलन केलं 28 ग्रामस्थांनी सहभाग नोंदवला 14 जून पासून सुरू असलेल्या धरणे आंदोलनात सामूहिक मुंडन आंदोलन करण्यात आले . यावेळी सर्वांनी मुंडन करून ग्रामस्थांनी घोषणाबाजी केली या धरणे आंदोलनात सहा युवक अमरण उपोषणास बसले आहेत या आंदोलनात दिवसभरात परिसरातील नागरिकांनी भेटी दिल्या मुंडन केलेल्या 28 पॅक करून मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पार्सल मार्फत निषेधार्थ पाठवण्यात येणार असल्याचे सांगितले मुंडन करून जिजाऊ चौकात ते बस थांबा या मार्गाने रॅली काढून शासनाचा निषेध करण्यात आला सदर या मागणीसाठी बेमुदत उपोषणाला बसलेले युवकांना पाठिंबा म्हणून महिलांनी देखील 20 जून रोजी मशाल मोर्चा असंख्य महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते हा मोर्चा जिजाऊ चौक बस थांबा माळी गल्ली राम मंदिर आंबेडकर चौक कौसडी फाटा मार्गे आंदोलनासाठी दाखल झाला तरुणांनी केलेल्या बेमुदत धरणे आंदोलनाला गावातील महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रत्यक्ष भेटीतून पाठिंबा देत आहेत दरम्यान या आंदोलनात सहभागी असलेल्या दोन जणांची प्रकृती खालावलयाचे दिसून आले. या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने लवकरात लवकर अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## अजिंठ्यात मोफत शंभर जणांची नेत्र तपासणी



**अजिंठा प्रतिनिधी :** अजिंठा येथे सिद्धेश्वर हॉस्पिटल व कांताबाई नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सिद्धेश्वर हॉस्पिटल येथे मोफत नेत्र तपासणी मोहीम घेण्यात आली. जवळपास शंभर जणांनी नेत्र तपासणी केली. मोतीबिंदू झालेल्या १० जणांना जळगाव येथे रुग्णालयात स्वतः गाड्यात नेऊन उपचार करण्यात आले. वरील मोहीम यशस्वी करण्यासाठी सिद्धेश्वर हॉस्पिटलचे मालक डॉ. भाऊसाहेब सोळंके, नेत्र रुग्णालयाचे डॉ. संतोष राजनकर, योगेश माळी, अभिमन्यू पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

**४१ वर्षांची सेवा...:** माझ्या रुग्णालयात ४१ वर्षापासून रुग्ण उपचार घेत आहे. त्यांची कृतज्ञता फेडण्यासाठी मी वरील मोफत नेत्र तपासणी आणि उपचार कांताबाई जळगाव रुग्णालयाच्या माध्यमातून अजिंठा वासी आणि परिसरातील रुग्णांना दिली. अशी माहिती डॉ भाऊसाहेब सोळंके यांनी दिली.

## निंभोरा येथील जि.प.प्रा.शाळा शाळेतील विद्यार्थ्यांची केंद्रीय नवोदय विद्यालय येथे निवड



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२४ जून :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निंभोरा केंद्र गोंदेगाव तालुका सोयगाव या शाळेचा विद्यार्थी रुनित मनोहर पाटील या विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ला केंद्रीय नवोदय विद्यालय येथे नुकतीच निवड झाली आहे.त्यानिमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निंभोरा ता.सोयगाव केंद्र गोंदेगाव येथील शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती तसेच शाळा आणि ग्रुप ग्रामपंचायत गलवाडा (ब) म्हशीकोठा, निंभोरा च्या वतीने छोट्याखानी सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवर यांनी केलेल्या परिश्रमाबद्दल विद्यार्थी रुनित पाटील याचे कौतुक केले.त्याचप्रमाणे मार्गदर्शक वर्गशिक्षक कृष्णा पाटील आणि मुख्याध्यापक व शिक्षक यांचे अभिनंदन केले.शाळा व शिक्षक विद्यार्थ्यांसाठी घेत असलेल्या परिश्रमाबद्दल गावकऱ्यांनी यावेळी आवर्जुन उल्लेख करत अशाच उल्लेखनीय कामासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रकाश माने यांनी केले. सूत्रसंचालन विशाल चौधरी यांनी केले तर जगन्नाथ चौधरी यांनी आभार मानले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य त्याचप्रमाणे गावातील शिक्षणप्रेमी नागरिक व गावकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## 'तुम से तुम तक'ने बदलला निहारिकाचा प्रेमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन

छत्रपती संभाजीनगर : झी टीव्हीवरील 'तुम से तुम तक' मालिकेत अनु आणि आर्य यांच्या विवाहाचा बहुप्रतीक्षित क्षण नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला. अनेक संकटे, गैरसमज आणि सामाजिक दबावांचा सामना करत अखेर हे दोघे विवाहबद्ध झाले. अनुची भूमिका साकारणाऱ्या निहारिका चौक्सीने सांगितले की, या

## सी.व्ही.रमण बालवैज्ञानिक परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२४ जून :** सी.व्ही.रमण बालवैज्ञानिक परीक्षेत यश संपादन करून उत्तीर्ण झालेल्या कु.वेदिका गणेश पवार जरंडी या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे,तसेच सानिका विशाल महाजन,रिद्धी हेमंत पाटील, अनुष्का समाधान पाटील,कोमल पाटील,निधी पाटील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आरंभ कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. योगेश काळे प्रा. प्रणय कुलकर्णी यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत,चिकाटी आणि जिज्ञासू वृत्तीच्या बळावर हे यश मिळविल्याबद्दल त्यांनी कौतुक व्यक्त केले.यावेळी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देताना,क्लासच्या संचालकांनी विद्यार्थ्यांनी विज्ञान क्षेत्रात अधिक प्रगती करून आपल्या शाळेचे,पालकांचे व परिसराचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन त्यांनी केले.तसेच आगामी स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांनी असेच उल्लेखनीय यश संपादन करावे,अशी अपेक्षा व्यक्त केली.

आरंभ कोचिंग क्लासेसतर्फे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## अरुण प्रभाकर आष्टीकर यांचे निधन



हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**बिडकीन दि २४ जून :** अरुण प्रभाकर आष्टीकर वय ६० रा बिडकीन ता पैठण यांचे दि २४ जून बुधवार सायंकाळी ४.३० वाजता दुःखद निधन झाले त्यांच्या पार्थिवावर शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर रात्री नऊ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले, त्यांच्या पश्चात पत्नी, आई, दोन मुलं, सून, असा परिवार आहे.

## मोतीराम नत्थु पवार यांचे निधन



**छत्रपती संभाजीनगर :** मोतीराम नत्थु पवार (वय 87 वर्षे) साईनगर, एन -6,सिडको , छ. संभाजीनगर यांचे दिनांक. २२ जून २६ रोजी सकाळी ९ वाजता वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले .त्यांच्या मागे पत्नी दोन मुले , तसेच सुना आणि नातवंडे असा परिवार असून त्यांचा अंत्यविध दिनांक. 22/06/2026 चार वाजता स्मशानभूमी एन 6 सेंट्रल नाका सिडको येथे झाले.

# स्मार्ट सिटीच्या 'आयसीसीसी' यंत्रणेचा आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रभावी वापर करा; मनपा आयुक्त अमोल येडगे यांचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत स्मार्ट सिटी कार्यालयातील पावसाळी नियंत्रण कक्ष येथे मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणी आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी मनपा प्रशासन सज्ज झाले असून, याच तयारीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपायुक्त अंकुश पांढरे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख स्वप्नील सरदार, अग्निशमन अधिकारी लोखंडे, आरआरटी सेलचे (आरोग्य विभाग) प्रमुख तसेच आयटी सेलचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान आयुक्त अमोल येडगे यांनी पावसाळी नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती, नागरिकांच्या तक्रार निवारणाची व्यवस्था आणि आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत पोहोचविण्याच्या सद्य कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी स्मार्ट सिटीच्या आयसीसीसी (Integrated Command and Control Centre) यंत्रणेचा आपत्तीपूर्व तयारी व आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रभावी वापर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून सखल भागांवर सातत्याने बारकाईने लक्ष ठेवून, पाणी साचल्यास संबंधित विभागांना वेळेवर सूचना देण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले. शहरातील पूरप्रवण व पाणी साचणाऱ्या संभाव्य भागांची अचूक यादी तयार करून तेथे तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यावर बैठकीत भर देण्यात आला. ज्या भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी स्थानिक नागरिकांची संपर्क व्यक्ती म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. या नागरिकांच्या माध्यमातून त्या-त्या भागातील परिस्थितीची थेट माहिती मिळवून तक्रारींचे तातडीने निवारण केले जाईल. याशिवाय, शहरातील अत्यावश्यक सेवा व महत्त्वाच्या ठिकाणांचे (Critical Infra-structure) डिजिटल मॅपिंग करून सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या. पावसाळी नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण देण्यासोबतच, स्मार्ट सिटी अंतर्गत बसविण्यात आलेली सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली (Public Address System) चोवीस तास कार्यरत ठेवून त्याची नियमित पडताळणी करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जलद सेवा देण्यासाठी महानगरपालिका व स्मार्ट सिटीच्या चॅटबॉटमध्ये आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सेवांचे तात्काळ एकत्रीकरण (Integration) करण्यात येणार आहे. तसेच पदमपुरा फायर कंट्रोल रूमचा व्हॉट्सॲप क्रमांक पावसाळी नियंत्रण कक्षाशी जोडून आपत्तीविषयक माहिती संबंधित अधिकारी व विभागांपर्यंत त्वरित पोहोचविण्याची अद्ययावत व्यवस्था केली जात आहे. पावसाळ्यात शहरातील नागरिकांना जलद, समन्वयित व प्रभावी सेवा उपलब्ध व्हाव्यात, तसेच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला यंत्रणेने तत्परतेने प्रतिसाद द्यावा, या उद्देशाने वरील सर्व उपाययोजनांवर तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश आयुक्त येडगे यांनी शेवटी सर्व संबंधित विभागांना दिले.

# मराठवाड्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट. त्यांच्यावर आळा घालण्याची मागणी : आ डॉ पाटील

### बोगस डॉक्टरांचा प्रश्न विधानसभेत मांडला, सरकारकडून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :** जिल्हा सह मराठवाडा विभागात कार्यरत असलेले बोगस डॉक्टरांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी आ डॉ विधानसभेत प्रश्न उपस्थित करताना केली. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले

परभणी चा मराठवाडा विभागात बोगस डॉक्टर संख्या वाढली आहे रुग्णावर चुकीच्या पद्धतीने उपचार होत असल्याचा मुद्दा आमदार डॉक्टर राहुल पाटील यांनी विधानसभेत पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी उपस्थित केला यावेळी बोलताना आमदार डॉक्टर राहुल पाटील म्हणाले की मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात बोगस डॉक्टरांची संख्या वाढली आहे विशेषता बंगाली डॉक्टरा कडे कुठलीही पदवी नाही तरी देखीलतें ग्रामीण भागात वैद्यकीय व्यवसाय करत रुग्णांच्या जीवनाशी खेळ करीत असल्यामुळे या बोगस डॉक्टरांवर कारवाई करावी अशी मागणी आ. डॉ राहुल पाटील यांनी केली उगाच डॉक्टर कारवाई करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती आहेत परंतु त्या समिती कुठल्याही प्रकारच्या तपासण्या अथवा बोगस डॉक्टर कारवाई करत नसल्याचा आरोप यावेळीआ डॉ. राहुल पाटील यांनी केला.

या समितीमध्ये लोकप्रतिनिधीचा समावेश करावा त्यामुळे अशा सर्वच बोगस डॉक्टरांची तपासणी करून त्यांचा वैद्यकीय परवाना पहावा आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी त्याला उत्तर देताना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी उत्तर दिले. ते म्हणाले बोगस डॉक्टर संदर्भात तपासणीसाठी असलेल्या समित्यामध्ये लोकप्रतिनिधींचा सभा करण्यात येईल नव्याने समित्या नियुक्त करू असे आश्वासन हसन मुश्रीफ यांनी दिले या बोगस डॉक्टरा विरोधात नागरिकांनी तक्रारी कराव्यात असे आव्हान त्यांनी केले आमदार डॉक्टर राहुल पाटील यांच्या या प्रश्नामुळे बोगस डॉक्टरांचा प्रश्न ऐरणीवर आला असून सरकार निश्चितच त्याकडे लक्ष देऊन चालणाऱ्या या गोरख धंद्याला प्रशासन आळा आळा घालून त्याचा चौक बंदोबस्त करावा अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

# अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी लहु प्रहार संघटनेचा आज विभागीय आयुक्त कार्यालयासमोर 'नारळ अभिषेक'

**छत्रपती संभाजीनगर :** सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार अनुसूचित जाती आरक्षणाचे तात्काळ उपवर्गीकरण करावे, या प्रमुख मागणीसाठी लहु प्रहार संघटनेच्या वतीने उद्या एक अनोखे आंदोलन छेडण्यात येणार आहे. मातंग समाजाच्या शासन दरबारी प्रलंबित असलेल्या विविध न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि देवाला प्रसन्न करण्यासाठी उद्या, गुरुवार दिनांक २५ जून २०२६ रोजी दुपारी ठीक ३.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयासमोर "नारळ अभिषेक" आंदोलन केले जाणार आहे. या अभिनव आंदोलनाची जय्यत तयारी संघटनेकडून करण्यात आली आहे.

या महत्त्वपूर्ण आणि अभिनव आंदोलनात छत्रपती संभाजीनगर शहर आणि जिल्ह्यातील मातंग समाज बांधवांनी, तसेच महिला भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन लहु प्रहार संघटनेच्या राज्य व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केले आहे. आवाहन करणाऱ्यांमध्ये संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कचरू कांबळे, राज्य उपाध्यक्ष संदीप चांदणे, राज्य महासचिव राहुल घोरपडे, प्रवक्ते आनंद लोखंडे, संपर्क प्रमुख मुकेश जाधव, राज्य संघटक मच्छिंद्र बहिलम, मराठवाडा अध्यक्ष यशराज इंचाळकर, मराठवाडा कार्याध्यक्ष राजू अहिरे सर, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीप वैरागळ, जिल्हाध्यक्ष समाधान ईच्चे, शहराध्यक्ष कैलास भालेराव, काकासाहेब नाडे, कचरू घोरपडे, अमोल भालेराव, संतोष काळे, सोपान नाडे, आकाश घोरपडे आणि अनिल सरोदे यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

# 'चित्रपटाचे शास्त्र - संहिता ते समीक्षा' पुस्तकाला म. भी. चिटणीस वाङ्मय पुरस्कार

### एमजीएम विद्यापीठाच्या डॉ. शिव कदम यांचा सन्मान; चित्रपटशास्त्रावरील मौलिक योगदानाची दखल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा साहित्य परिषदेचा प्रतिष्ठेचा प्राचार्य म. भी. चिटणीस उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सचे विभागप्रमुख डॉ. शिव कदम यांना त्यांच्या 'चित्रपटाचे शास्त्र - संहिता ते समीक्षा' या पुस्तकासाठी प्रदान करण्यात आला. मराठवाडा साहित्य परिषदेच्या ना. गो. नांदापूरकर सभागृहात आयोजित समारंभात प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी प्रा. फ. मु. शिंदे, प्रा. दासू वैद्य, दादा गोरे, डॉ. कैलास अंभुरे आणि छाया महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुरस्कारप्राप्त ग्रंथाविषयी भाष्य करताना डॉ. विश्वाधार देशमुख यांनी सांगितले की, सव्वाशे वर्षांची परंपरा लाभलेल्या चित्रपटकलेने संपूर्ण जग व्यापले असले तरी तिचा शास्त्रीय अंगाने विचार फारसा झाला नाही. डॉ. शिव कदम यांनी चित्रपटाचे स्वरूप, व्याकरण, कथाशास्त्र आणि समीक्षा यांचे सखोल विवेचन करताना प्रात्यक्षिकांची जोड दिली असून, चित्रपटशास्त्राच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ महत्त्वाचा ठरेल.

यावेळी बोलताना प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील म्हणाले की, भारतात चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ एका मराठी व्यक्तीने रोवली; मात्र चित्रपटाच्या शास्त्रीय अभ्यासावर फारसे संशोधन झाले नाही. हे महत्त्वाचे कार्य एका मराठी अभ्यासकाने केल्याचा विशेष अभिमान वाटतो.

या सोहळ्यात डॉ. साहेब खंदारे, उमा नंबर, अनुराग लव्हेकर आणि क्षितीज देसाई यांचाही सन्मान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना डॉ. शिव कदम यांनी सांगितले की, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांनी चित्रपटासारख्या अनवट आणि सर्जनशील कलेसाठी आवश्यक शैक्षणिक परिसंस्था निर्माण केल्यामुळेच या ग्रंथाची निर्मिती शक्य झाली. तसेच साकेत प्रकाशनाने पुस्तक प्रकाशित करून महत्त्वाचे योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्समध्ये प्रत्यक्ष चित्रपट निर्मिती, प्रशिक्षण आणि संशोधन यांना चालना मिळत असल्याबद्दल कुलपती अंकुशराव कदम यांनी समाधान व्यक्त केले.

## गंगाखेड केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन अध्यक्षपदाच्या निवडणुकीत कारभारी निरस यांचा विजय



हिंदू प्रकाश वार्ता

**गंगाखेड :** तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत कारभारी निरस यांनी विजय मिळवत अध्यक्षपद पटकावले.शहरातील गीता मंडळ येथे (दिनांक २४ जून मंगळवार) रोजी उत्साहपूर्ण वातावरणात ही निवडणूक प्रक्रिया पार पडली.असोसिएशनच्या एकूण १५० सभासदांपैकी १४१ सभासदांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.अध्यक्षपदासाठी कारभारी निरस आणि अमोल कोकडवार यांच्यात थेट लढत झाली. यामध्ये कारभारी निरस यांना ८४ मते मिळाली, तर अमोल कोकडवार यांना ५७ मते मिळाली.त्यामुळे कारभारी निरस यांनी २७ मते जास्त घेत विजय संपादन केला.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संजय तापडिया यांनी जबाबदारी पार पाडली.निवडणुकीच्या प्रक्रियेसाठी परभणी जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष संजय मंत्री,जिल्हा उपाध्यक्ष मुन्ना घाडगे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. अत्यंत चुरशीच्या वातावरणात मतदान प्रक्रिया शांततेत आणि उत्साहात पार पडली.निकाल जाहीर झाल्यानंतर विजयी उमेदवार कारभारी निरस यांचे सभासदांनी अभिनंदन करत जल्लोष केला.

याप्रसंगी गंगाखेड केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने परभणी जिल्हा असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संघटनेच्या बळकटीसाठी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले.नव्याने निवडून आलेले तालुकाध्यक्ष कारभारी निरस यांचाही यावेळी सभासदांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी निरस यांनी गंगाखेड केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या सभासदांच्या आणि औषध विक्रेत्यांच्या विवीध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सदैव पाठीशी उभे राहून काम करेल अशी ग्वाही दिली.

## मालेवाडी येथे खरीप पूर्व हंगामाबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण



हिंदू प्रकाश वार्ता

**गंगाखेड :** येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालय,यांच्या वतीने खरीप हंगाम मोहीम अंतर्गत तालुक्यातील मालेवाडी येथे शेतकरी बांधवांसाठी खरीप पूर्व हंगाम प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.(दिनांक २३ जून मंगळवार) रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास गावातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.कार्यक्रमामध्ये खरीप हंगामातील विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सहायक कृषी अधिकारी बालाजी कोरडे यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्याची उगवण क्षमता चाचणी,बीज प्रक्रिया,बीबीएफ पद्धतीने सोयाबीन लागवड,टोकण पद्धतीने पेरणी तसेच हवामानातील बदल आणि अल निनोच्या पार्श्वभूमीवर आंतरपीक पद्धतीचे महत्त्व याबाबत सखोल माहिती दिली.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार बियाण्यांचा वापर,योग्य अंतरावर पेरणी,बियाण्यांवर बीज प्रक्रिया करून पेरणी करणे तसेच बदलत्या हवामानाचा विचार करून पीक नियोजन करण्याचे आवाहन केले.अल निनोमुळे निर्माण होणाऱ्या अनिश्चित पावसाच्या परिस्थितीत आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास उत्पादनातील जोखीम कमी होऊन आर्थिक फायदा मिळू शकते,असेही त्यांनी सांगितले. यावेळी शेतकऱ्यांनी विविध शंकांचे निरसन करून आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेतली.कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचीही माहिती देण्यात आली.

## राघवच्या भूमिकेतील भावनांचा समतोलच खरे आव्हान – भरत अहलावत

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेतील राघव आणि रीत यांच्या आयुष्यातील भावनिक घडामोडींनी प्रेक्षकांना गुंतवून ठेवले आहे. नवजात बाळाच्या निधनाच्या कथानकामुळे मालिकेत भावनिक वातावरण निर्माण झाले असून राघवची भूमिका अधिक आव्हानात्मक बनली आहे.

राघवची भूमिका साकारणारे भरत अहलावत म्हणाले की, रीतवरील प्रेम आणि कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी यांच्यात समतोल राखणे हे या व्यक्तिरेखेचे सर्वात मोठे आव्हान आहे. "राघव कोणालाही दुखावू इच्छित नाही, मात्र परिस्थिती त्याला कठीण निर्णय घेण्यास भाग पाडते. त्याच्या भावना आणि प्रतिक्रियांतील सूक्ष्म बारकावे काळजीपूर्वक साकारावे लागतात, कारण छोटासा बदलही त्याला एका बाजूकडे झुकल्यासारखा दाखवू शकतो," असे त्यांनी सांगितले. दरम्यान, प्रेक्षकांना माहिती असलेले धक्कादायक सत्य म्हणजे राघव आणि रीतचे बाळ जिवंत असून त्याचे अपहरण शारदा बुआने केले आहे. हे रहस्य उघड झाल्यानंतर कथानकाला कोणते वळण मिळणार, याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये वाढली आहे.

# अंधारी प्रशालेत NMMS शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता



**अंधारी :** अंधारी प्रशाला येथे २४ जून रोजी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात NMMS शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा पालकांसह गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमास जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या शिक्षण व आरोग्य सभापती अनिता मोठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना अनिता मोठे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत व चिकाटीच्या बळावर यशाचे शिखर गाठावे, असे सांगितले. शालेय जीवनातच यशाची पायाभरणी होत असल्याने विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच शाळेत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक करून शाळेची प्रगती अशीच सुरू राहावी, अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या मंगलताई तायडे, गटशिक्षणाधिकारी आर. डी. महाजन, शिक्षण विस्तार अधिकारी रमेश ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात NMMS शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा पालकांसह सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास ज्ञानेश्वर मोठे, ज्ञानेश्वर तायडे, महानंदाबाई तायडे, डॉ. मनोहर गोरे, रमेश तायडे, सर्जेराव जाधव, मुख्याध्यापक एकनाथ जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना हिंगमिरे यांनी केले. प्रास्ताविक भाऊसाहेब गोराडे यांनी केले, तर मुख्याध्यापक एकनाथ जाधव यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. श्रीकृष्ण बडक यांनी आभार प्रदर्शन केले.

## शिवना परिसरात मान्सूनचे दमदार आगमन; शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना परिसरात मान्सूनचे आगमन झाल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला असून, परिसरात झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतीच्या कामांना वेग आला आहे. मान्सूनपूर्व मशागत पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांनी आता खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना सुरुवात केली आहे. विशेषतः कापूस, मका, सोयाबीन, बाजरी व भाजीपाला पिकांच्या लागवडीसाठी हा पाऊस लाभदायक ठरणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

गेल्या काही महिन्यांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे व पाणीटंचाईमुळे नागरिकांसह शेतकरी त्रस्त झाले होते. मात्र, मान्सूनच्या आगमनामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून शेततळी, विहिरी व जलस्रोतांमध्ये पाण्याची आवक सुरू झाली आहे.

"वेळेवर झालेला पाऊस हा खरीप हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे पिकांची उगवण चांगली होण्यास मदत होईल," अशी प्रतिक्रिया परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

मान्सूनच्या आगमनामुळे शिवना परिसरातील शेतकरी वर्ग नव्या आशा आणि उत्साहाने शेतीच्या कामात गुंतला असून यंदा चांगल्या उत्पादनाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## 28 जूनला पल्स पोलिओचा महाअभियान; पाच वर्षांखालील एकही बालक राहू नये वंचित

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत २८ जून रोजी शहरात व्यापक लसीकरण अभियान राबविण्यात येणार असून पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओ प्रतिबंधक लसीकरणापासून वंचित राहू नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांनी केले. या मोहिमेच्या प्रभावी नियोजनासाठी स्मार्ट सिटी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली कमिशनर टास्क फोर्सची आढावा बैठक पार पडली.

बैठकीस जागतिक आरोग्य संघटनेचे डॉ. सय्यद मुजीब, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्ज्वला भांबरे, पल्स पोलिओ मोहिमेच्या नोडल अधिकारी डॉ. मेघा जोगदंड, विविध विभागांचे अधिकारी, खाजगी रुग्णालयांतील डॉक्टर तसेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यंदाच्या मोहिमेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील सुमारे १ लाख ९९ हजार ५६ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी ६९१ पोलिओ बूथ, ५९३ घरभेट पथके, १३५ ट्रान्झिट पथके, २२ मोबाईल पथके आणि ३ विशेष रात्रीची पथके कार्यरत राहणार आहेत. या संपूर्ण मोहिमेसाठी तब्बल २०५० अधिकारी-कर्मचारी आणि स्वयंसेवकांचे मनुष्यबळ तैनात करण्यात येणार असून नियंत्रणासाठी मनपा मुख्यालयात स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू राहणार आहे. २८ जून रोजी 'बूथ डे'नंतर पुढील पाच दिवस घरभेटीद्वारे बालकांचा शोध घेऊन लसीकरण केले जाणार आहे. विशेषतः बसस्थानके, रेल्वे स्थानके, विमानतळ, मॉल्स, धार्मिक स्थळे, बांधकामे, वीटभट्ट्या, स्थलांतरित मजुरांच्या वस्त्या आणि इतर उच्च जोखीम क्षेत्रांमध्ये विशेष ट्रान्झिट व मोबाईल पथकांमार्फत बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत.

मोहिमेच्या यशासाठी शाळा रॅली, बॅनर, पोस्टर्स, सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप, वृत्तपत्रे, एफएम रेडिओ, केबल नेटवर्क, माईकद्वारे प्रचार तसेच धार्मिक स्थळांमधून जनजागृती केली जाणार आहे. आयएमए, आयएपी, रोटरी क्लब, लायन्स क्लब, एनसीसी, एनएसएस, शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, परिवहन विभाग आणि विविध स्वयंसेवी संस्थांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीत सर्व विभागप्रमुखांना त्यांच्या कार्यक्षेत्रात जनजागृती, बूथवरील स्वच्छता, मनुष्यबळाची उपलब्धता, उच्च जोखीम भागांचे पर्यवेक्षण आणि सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. "पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील बालकाला २८ जून रोजी जवळच्या पोलिओ बूथवर नेऊन पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत," असे आवाहन अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांनी केले.

## परभणीrत अनधिकृत पाणी उपशावर प्रतिबंध करणे जिल्हाधिकारीयांचे आदेश उल्लंघन केल्यास होणार कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :** अल निनोचे संकट घोंगावत असल्याने संभाव्य परिणामामुळे यंदाच्या पावसाळ्यात सरासरी पेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे भविष्यात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण होऊ नये, जिल्हा प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. जिल्ह्यात धरण, प्रकल्प, जलाशय, नद्या, कालवे व इतर जलसोत्रांमधून होणारा अनाधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा प्रतिबंधित करण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी आदेश काढले आहेत.

जलसंपदा विभागाने राज्यातील धरणे, जलाशय व इतर जलस्तोत्रा मधील उपलब्ध पाणीसाठा यांचा विचार करून पिण्याच्या पाण्याच्या गरजांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत परभणी जिल्ह्यातील नागरिकांना भविष्यात पिण्याच्या पाण्याचा पुरेसा जलसाठा उपलब्ध राहावा, संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करता यावा यासाठी पाणीपूर्व पाणीसाठा संरक्षित ठेवणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जल स्तोत्रा मधून अनाधिकृत अथवा बेकायदेशीर पाणी उपसा करणाऱ्या व्यक्ती, संस्था व समूहावि कठोर कार्यवाही करण्यात येणार आहे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम तसेच इतर लागू कायदेशीर तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## मराठा विद्यार्थ्यांना ओबीसींच्या सवलती द्या डॉक्टर राजेश करपे यांची मागणी

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी :** राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्याप्रमाणे प्रवेश शुल्क व इतर शैक्षणिक सवलती लागू केल्या आहेत त्याविषयीचा शासन निर्णय जाहीर केला आहे मात्र या निर्णयाची अंमलबजावणी अनेक महाविद्यालय करीत नाही त्यामुळे विद्यापीठ आणि उच्च शिक्षण विभागाने या निर्णयाचा अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्याची मागणी करणारे निवेदन बामुक्टा संघटनेतर्फे विद्यापीठ व विभागीय सहसंचालकांना दिले आहे निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष डॉ.राजेश करपे, सचिव डॉ.प्रशांत कुमार वेनेज ,आदिसक्षा सदस्य प्रा. हरिदास सोमवंशी आधीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ऑपरेशन शोध-4 ला मोठे यश; 17 हरवलेली लेकरं सुखरूप कुटुंबात परतली

## ग्रामीण पोलिसांच्या अथक प्रयत्नांनी 17 कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा फुलला आनंद; 13 मुली व 4 मुलांचा शोध

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** घरातून निघून गेलेल्या प्रत्येक मुलामागे एका आईची तगमग, वडिलांची असहाय्यता आणि संपूर्ण कुटुंबाचे उद्ध्वस्त झालेले विश्व असते. हेच विश्व पुन्हा उभे करण्याचे संवेदनशील काम छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी 'ऑपरेशन शोध-4' मोहिमेतून करत १७ हरवलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना सुखरूप कुटुंबीयांच्या स्वाधीन केले आहे.

महाराष्ट्र राज्यात अपहृत व हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी ८ ते २३ जूनदरम्यान राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन शोध-4' मोहिमेत ग्रामीण पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी करत १३ मुली आणि ४ मुलांचा शोध लावला. या यशामुळे १७ कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा आनंद, विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

घरातील रिकामी खोली, लेकराच्या प्रतीक्षेत जागून काढलेल्या रात्री, प्रत्येक फोनच्या घंटीवर वाढणारी धडधड आणि जेवणाच्या ताटाकडे लागलेली नजर... या सर्व वेदनांना या मोहिमेने दिलासा दिला आहे.

प्रेमसंबंध, राग आणि आकर्षण ठरले घर सोडण्याचे कारण

शोध लागलेल्या १७ बालकांपैकी ११ मुली प्रेमसंबंधांच्या प्रभावामुळे, २ मुली रागाच्या भरात, ३ मुले मोठे शहर पाहण्याच्या आकर्षणातून, तर १ मुलगा कौटुंबिक वादामुळे मानसिक तणावाखाली घर सोडून गेला होता.

पोलिसांच्या तपासात सोशल मीडियाचे वाढते आकर्षण, आभासी नात्यांची भुरळ, भावनिक आधाराची आश्वासने आणि वास्तवापासून दूर नेणारी डिजिटल दुनिया ही अनेक प्रकरणांमागील प्रमुख कारणे असल्याचे समोर आले.

इंस्टाग्रामच्या आभासी दुनियेत हरवलेली मुलगी पुण्यात सापडली

चिकलठाणा पोलीस ठाणे हद्दीतील १७ वर्षीय मुलगी सोशल मीडियावर विशेषतः इंस्टाग्रामवर सक्रिय होती. आभासी जगातील आकर्षण, उच्चभ्रू जीवनशैलीची मोहिनी आणि घरातील शिस्तीमुळे निर्माण झालेल्या नाराजीतून तिने घर सोडले होते. पोलिसांनी सोशल मीडिया अकाऊंट्सची तपासणी करून तपासाची दिशा शोधली आणि ती पुण्यातील मैत्रिणीकडे असल्याचे निष्पन्न झाले. समुपदेशनानंतर तिला कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले.

आई-वडिलांच्या भांडणांना कंटाळून मुलाने सोडले घर

करमाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १४ वर्षीय मुलगा आई-वडिलांमधील सततच्या वादामुळे मानसिकदृष्ट्या त्रस्त झाला होता. त्याने घर सोडल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी बसस्थानके, रेल्वे स्थानके आणि सार्वजनिक ठिकाणी शोधमोहीम राबवली. अखेर तो मुकुंदवाडी रेल्वे स्थानक परिसरात आढळून आला. समुपदेशन करून त्याला पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

अभ्यासाच्या तणावातून मुलीचे टोकाचे पाऊल

शिऊर पोलीस ठाणे हद्दीतील १७ वर्षीय मुलगी अभ्यासाच्या कारणावरून आईशी झालेल्या वादानंतर घर सोडून गेली होती. पोलिसांनी नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडे चौकशी केल्यानंतर ती नातेवाईकांकडे सुखरूप असल्याचे समोर आले. समुपदेशनानंतर तिला पालकांकडे सोपविण्यात आले.

# ग्रामीण पोलिसांचे गृहस्वप्न साकार; 96 अधिकारी-अंमलदारांना ₹30.90 कोटींचे घरबांधणी कर्ज मंजूर

## प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली निधी थेट खात्यात जमा; पोलीस कुटुंबांना मोठा दिलासा

हिंदू प्रकाशवार्ता: प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ :** छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या घरबांधणी अग्रिम (डीजी लोन) योजनेअंतर्गत ग्रामीण पोलीस दलातील ९६ अधिकारी व अंमलदारांना तब्बल ₹३० कोटी ९० लाख ५१ हजार इतका निधी मंजूर करण्यात आला असून ही रक्कम मंगळवारी संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये थेट वर्ग करण्यात आली.

महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या आदेशानुसार मंजूर झालेल्या या निधीमुळे लाभार्थींना नवीन घर बांधणे, सुरू असलेले बांधकाम पूर्ण करणे तसेच गृहसंबंधित आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडणे अधिक सोपे होणार आहे.

शासनाच्या गृह विभागाच्या विविध निर्णयांनुसार आणि वित्तीय नियमांच्या चौकटीत ही मंजुरी देण्यात आली आहे. निधीचा लाभ लाभार्थ्यांना तातडीने मिळावा यासाठी पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यात आली. त्यामुळे मंजूर झालेली संपूर्ण रक्कम एका दिवसात थेट खात्यांमध्ये जमा करण्यात आली.

पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दिवस-रात्र जनतेच्या सेवेत कार्यरत असतात. कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे प्रतिबंध करणे आणि विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये कर्तव्य बजावताना अनेकदा वैयक्तिक गरजांकडे दुर्लक्ष करावे लागते. अशा परिस्थितीत स्वतःचे घर असणे हे त्यांच्यासाठी मोठे स्वप्न असते. शासनाच्या या निर्णयामुळे त्या स्वप्नपूर्तीकडे महत्त्वाचे पाऊल पडल्याची भावना लाभार्थ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

या घरबांधणी अग्रिमामुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेला बळ मिळणार असून त्यांच्या कुटुंबीयांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. स्वतःचे घर हे प्रत्येक कुटुंबासाठी स्थैर्य, सुरक्षितता आणि सन्मानाचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे या योजनेमुळे ग्रामीण पोलीस दलातील अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## तुषार भैय्या दुधाटे गोळेगावकर बिनविरोध



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळ निवडणुकीत 24 जून रोजी पालम तालुक्यातून सोसायटी प्रवर्गातून तुषार भैय्या दुधाटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली तुषार भैय्या चा मनमिळाव स्वभाव व कार्यकर्त्यात मिसळून राहण्याचा गुण व त्यांची सामाजिक प्रश्न विषय असलेली ओढ यामुळे ते सर्वसामान्यांमध्ये परिचित असून त्यांच्या या कार्याची पावती म्हणून त्यांची ही बिनविरोध निवड झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवशक्ती निर्माण झाली असून तरुण युवकांच्या व शेतकरी वर्गांच्या त्यांच्याकडून अशा पल्लवी झाले असून बुधवार दिनांक 24 जून रोजी शेतकरी भावनात 122 उमेदवारांची छाननी होती त्यात तुषार भैय्या दुधाटे गोळेगावकर यांच्या विरोधात एकही अर्ज भरला नसल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली आहे यावेळी ग्रामीण व शहरी भागातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त घाटीत 'एलिक्सिर 2026' क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ

## 27 जूनपर्यंत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन; डॉ. शिवाजी सुक्रे यांचा विद्यार्थ्यांसोबत सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनाचे औचित्य साधून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील जिमखाना विभागामार्फत 'एलिक्सिर २०२६' या क्रीडा महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शारीरिक प्रशिक्षण निर्देशक कु. आशिका कनक बरालिया आणि डॉ. एम. एस. बेग यांच्या मार्गदर्शनाखाली २३ ते २७ जून दरम्यान विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या क्रीडा महोत्सवात व्हॉलीबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ (चेस) तसेच टग ऑफ वॉर आदी स्पर्धांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करणे, शारीरिक तंदुरुस्ती वाढविणे आणि संघभावना विकसित करणे हा उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

उद्घाटन समारंभास अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, उपअधिष्ठाता डॉ. मुंदडा तसेच शारीरिक प्रशिक्षण निर्देशक कु. आशिका कनक बरालिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. सुक्रे यांनी विद्यार्थ्यांसोबत व्हॉलीबॉल खेळत उत्कृष्ट सर्व्हिस सादर केली. तसेच कॅरम, टेबल टेनिस, क्रिकेट आणि व्हॉलीबॉल या खेळांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेत स्पर्धांचे उद्घाटन केले. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. 'एलिक्सिर २०२६' क्रीडा महोत्सवास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, विविध स्पर्धा आनंददायी आणि स्पर्धात्मक वातावरणात पार पडत आहेत.

## परभणी जिल्हा रुग्णालयातील 5 डॉक्टरांची जिल्हा शल्य चिकित्सक पदी निवड



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात आलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक गट अ या पदाचा निकाल गुणवत्ता यादी सोमवार दिनांक 22 जून रोजी जाहीर करण्यात आला जगात जर्मनी भारतात परभणी तील जिल्हा सामान्यरुग्णालयातील कार्यरत असणारे पाच नामांकित डॉक्टरांना मोठे यश मिळवले असून त्यांची जिल्हा शल्य चिकित्सक पदी निवड झाली आहे. या गुणवत्ता यादीत परभणी जिल्हा रुग्णालयातील सध्या अतिरिक्त जिल्हा शल्यचिकेसक म्हणून कार्यरत असणाऱ्या गुणवत्ता यादीत बारावे स्थान पटकावून वैद्यकीय क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे डॉक्टर मनीषा बाबुराव राठोड डॉ. संज्योत राजेंद्रगिरी डॉ सारंग नंदकिशोर विश्वनाथ. डॉ. शाकीरूल करीम रज्जाकी या परीक्षेत घुगे यश मिळवत जिल्हा शल्य चिकित्सक पदासाठी आपली निवड निश्चित केली आहे परभणी जिल्हा रुग्णालयातील अविरत आरोग्य सेवा देत असतानाच या डॉक्टरांनी मिळवलेल्या अत्यंत मानाच्या अशा वर्ग एक पदावरील निवडीमुळे रुग्णालयाच्या नावलौकिक वाढला आहे लवकरच या पाच डॉक्टरांना नवीन नियुक्ती देण्यात येतील त्यांच्या या यशाबद्दल सर्व वैद्यकीय अधिकारी कर्मचारी आणि परभणीकरंकडून यशस्वी डॉक्टरवर अभिनंदनचा वर्षाव होत आहे .

# तरुणांमध्ये नवचैतन्य : निवडणुकीमध्ये तरुणांचा सहभाग






हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**बोरगाव :** आता लोकशाहीचा पवित्र उत्सव येत आहे. सध्या गल्ले बोरगाव गावामध्ये निवडणुकीची चर्चा चांगलीच रंगात निर्माण करत आहे.

या निवडणुकीमध्ये पहिल्यांदाच सर्व समाजातील तरुणांनी चांगलाच रस दाखवायला मिळत आहे. या निवडणुकीमध्ये समाजासाठी, गावासाठी, विद्यार्थ्यांसाठी, समाजसेवा करणारे युवक निवडणूक म्हटली की, बाजूला निघून जायचे,परंतु या वेळेस तरुणांनी चांगलीच या निवडणुकीमध्ये रंगत निर्माण करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासाठी सर्व स्तरातील तरुण एकत्र येऊन काही अनुभवी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीच्या माध्यमातून जनतेच्या, गावाच्या, समाजसेवेसाठी पुढे येताना दिसत आहे. चांगले शिकलेले तरुण स्वतःचा प्रपंच सांभाळून, व्यवसाय सांभाळून, शेती उद्योग सांभाळून, कार्यक्षमता असलेले तरुण, निर्व्यसनी असं तरुणांचा एक गट पुढे येऊन 100% समाजसेवा करण्यासाठी पुढे येताना दिसत आहे. ही चर्चा दररोज बस स्टॉप, वर चहाच्या हॉटेलमध्ये, टपरीवर संध्या रंगात आहे.गावातील तरुणांना राजकारणात आले पाहिजे जनहिताची कामे सामाजिक सदभावना घेवुन तळागाळातील जनतेची कामे मार्गी लावण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे हाच एकमेव धोरण या निवडणुकीत उतरुन समाजातील प्रत्येक वंचित घटकांना न्याय मिळावा या साठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा निर्धार करत नवचैतन्य निर्माण करण्याच्या भुमिकेतुन आणि सर्वांगिण विकासाच्या मुद्दयावर निवडणुक लढवण्याचा चंग बांधुन गावातील सर्व तरुण मंडळी एकोप्याने ही निवडणुक लढतील असेच सध्या तरी चित्र पाहावयास मिळत आहे

## बळीराम चव्हाण यांना पीएच. डी. प्रदान



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने राज्यशास्त्र विषयात बळीराम शेषेराव चव्हाण यांना पीएच. डी. प्रदान केली आहे. विवेकानंद कला सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राज्यशास्त्र संशोधन केंद्रातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र शेजुळ यांच्या संशोधन केंद्रांतर्गत व डॉ. सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्रातील बंजारा समाजाच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास - विशेष संदर्भ विदर्भ' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. छत्रपती संभाजी नगर सह धाराशिव परिसरात त्यांचे अभिनंदन होत आहे.

# सोयगाव तालुक्यातील जरंडी शिवारात जोरदार पाऊस;-सोयगाव-बनोटी रस्त्यावरील वाहतूक ठप्प,खडकी नदीला पूर

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी





**सोयगाव,दि.२४ जून :** सोयगाव तालुक्यातील जरंडी सह परिसरात बुधवारी( दि.२४) सकाळी नऊ वाजेपासून सुरु झालेल्या जोरदार पावसाने जरंडी शिवारात हाहाकार उडाला होता. दरम्यान गावालगत असलेल्या जरंडीच्या खडकी नदीला सकाळी अकरा वाजता पूर आल्याने पुराने सोयगाव-चाळीसगाव राज्य मार्गावरील पूल वाहून गेला होता.त्यामुळे वाहतुक पाच तास ठप्प झाली होती पाच तासापासून सुरू असलेल्या जरंडीगावालगत असलेल्या खडकी नदीच्या पुराने सोयगाव-बनोटी-चाळीसगाव मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. तर गावाबाहेरील याच याच रस्त्यावरील पूल वाहून गेल्या मुळे सोयगाव-चाळीसगाव-संपर्क तुटला आहे दरम्यान ग्रामपंचायतीने या रस्त्यावरील रहदारी ठप्प असल्याचा सूचना दिल्या आहेत जरंडी परिसरात बुधवारी झालेल्या दोन तासांच्या ढगफुटी सदृश पावसाने नव्याने दुतर्फा रस्त्याचे सिमेंटी करणं सुरू आहे परंतु या रस्ता च्या संबंधित ठेकेदाराने रस्त्यावरील नाल्यांचे पाणी आणि वळण रस्ते पक्के न केल्याने जरंडी ते सोयगाव या रस्त्या दरम्यान वळण रस्तेही वाहून गेले आहे

---खडकी नदीला पूर

दरम्यान जरंडी च्या खडकी नदीला पहिलाच पूर आला असून या पुराने पाच तास वाहतूक ठप्प झाली होती मात्र तालुक्यात इतर भागात मध्यम पाऊस झाला आहे

दरम्यान जरंडी शिवारात झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने नुकत्याच जमिनी बाहेर आलेल्या कोवळ्या अंकुरांना पाण्याने वेढा घातला आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911